जनमाध्यम दि० 05/12/15

# विद्यापीठ अनुदान आयोगाचा नवीन पीएचडी अध्यादेश

**अमरावती/का.प्र.**

-विद्यापीठ अनुदान आयोगाने पीएचडीसाठी ठरवून दिलेल्या नवीन नियमावली नुसार संशोधक आणि गाइड यांना संशोधन कार्य करावे लागणार आहे. यासाठी गेल्या तीन दिवसांपासून सुरु असलेल्या बीयूटीआरच्या बैठकीत याला सहमती देण्यात आल्याचे वृत्त आहे.

नवीन नियम लागू करण्यासंदर्भात राज्यातील सर्वच विद्यापीठांना युजीसीने स्पष्ट आगेश दिले होते. जे विद्यापीठ नवीन नियम लागू करणार नाही त्यांना सुजीसीच्या वेबसाईडवर ब्लॅकलिस्टवर आले असते आणि त्याचा परिणाम युजीसीमार्फत मिळणाऱ्या निधीवरसुद्धा झाला असता म्हणून सर्वच विद्यापीठांनी

## बीयूटीआरच्या बैठकीत सर्वच विद्याशाखांचे एकमत



आता युजीसीचा नवीन अध्यादेशानुसार पीएचडी पदवीसाठी नवीन नियम लागू करण्यास सुरुवात

केली आहे. युजीसीने पीएचडी संदर्भात नवीन नियम लागू केल्यानंतर संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठात मंगळवारपासून बोर्ड ऑफ युनिव्हरसिटी टिचर्सची बैठक सुरु होती. या बैठकीत कला, विज्ञान, विधीशाखा, मेडीसिन, कॉमर्स, शिक्षण इंजिनियरिंग, समाज विज्ञान शाखा, गृहविज्ञान शाखा अशा सर्व शाखांचा समावेश होता.

ही बैठक तीन डिसेंबरपर्यंत चालली. प्रत्येक दिवशी तीन शाखांचे अधिष्ठाता व अभ्यास मंडळाचे अध्यक्ष हजर होते. गुरुवारी बैठकीचा समारोप करण्यात आला. तीन दिवस चालत्या बैठकीत युजीसीच्या पीएचडी संदर्भात ६ जुलै २०१५ आणि ४ सप्टेंबर २०१५ रोजी काढलेल्या अद्यादेशाबाबत चर्चा करण्यात आली. चर्चेदरम्यान सर्व शाखांनी नवीन नियमावलीनुसार गाईड, सेमिनार पूर्वपरीक्षा, कोर्सवर्क आता पीएचडीसाठी लागू करण्याचे ठरविले आहे. युजीनुसार गाईड हा पदव्युतर पदवीला शिकविण्याचा अनुभव असलेला असला पाहिजे. त्यामुळे पदवीला शिकविण्याचा अनुभव असलेले गाइड आता कमी होतील. गाईड हा विद्यापीठ परिक्षेत्रातीलच असावा, त्याचेकडे गाइडसाठी किमान ८ विद्यार्थी असले पाहिजेत. सद्या विद्यापीठात गाइडची संख्या मोठ्या प्रमाणात असून यापुर्वी एकै गाइड हा अनेक विद्यापीठात गाइड म्हणून कार्य करीत होता. यामुळे त्याच्याकडे प्रत्येक विद्यापीठातील आठ पेक्षा जास्त विद्यार्थी मार्गदर्शनासाठी राहत असत. यामुळे एक गाईड तीस चाळीस विद्यार्थ्यांना संशोधनासाठी काय मार्गदर्शन करीत असेल, याची कल्पना न केलेली बरी. आता युजीसीने ठरवून दिलेल्या नवीन नियमावलीमुळे हे सर्व बंद होणार आहे.